# रत्नागिरी नगरपरिषद,रत्नागिरी

## निविदा सूचना क्र. ९ सन २०११- १२

रत्नागिरी नगरपरिषदेकडून खाली नमूद केलेली महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) व १३ वा वित्त आयोग अंतर्गत कामांच्या योग्यत्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून मोहरबंद बाबवार दराच्या निविदा मागविणेत येत आहेत.

कामाची निविदा दिनांक २१ /१० /२०११ ते २९/१०/२०११ या मुदतीत कार्यालयीन कामाचे दिवशी सकाळी ११.०० ते सायंकाळी ४.०० या वेळांत नगरपरिषद कार्यालयांत कामकाजाचे वेळी आवश्यक ते शुल्क भरुन मिळतील. निविदा पोस्टाने पाठविल्या जाणार नाहीत.

यथोचितरीत्या भरलेली आणि सर्व दृष्टीने परीपूर्ण निविदा दिनांक ३१ / १० /२०११ रोजी दुपारी ३.०० वाजे पर्यत स्विकारणेत येतील व शक्य झाल्यास त्या दिवशी दुपारी ४.०० वाजता कंत्राटदारा समोर अथवा त्यांच्या प्रतिनिधी समोर उघडण्यात येतील. खाली दर्शविल्या प्रमाणे बयाणा रक्कम रोखीने नगरपरिषद कार्यालयांत भरावी लागेल. कंत्राटदारांनी त्यांची निविदा मंजूर झाल्याचे कळविले पासून १० दिवसांचे मुदतीत आवश्यक ते करारपत्र करुन दयावें लागेल तसेच कामाचे अंदाजित रक्कमेच्या पाच टकके इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून भरावी लागेल.

सशर्त निविदा स्विकारली जाणार नाही. करारनामा लिहून दिल्यानंतर दिलेल्या मुदतीत काम पूर्ण करुन दयावे लागेल.कोणतेही साहित्य किंवा यंत्रसामुग्री नगरपरिषदे कडून उपलब्ध करुन दिली जाणार नाहीत. जागेवरील परिस्थिती प्रमाणे मंजूर कामात घट केली गेल्यास त्याबाबत कंत्राटदाराला कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई दिली जाणार नाही. या संबंधी आवश्यक ती माहिती नगर परिषद कार्यालयांत बांधकाम विभागात कार्यालयीन वेळांत मिळू शकेल.

कोणतीही एक निविदा स्विकारण्याचा अथवा कारणाशिवाय सर्वच निविदा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवणेत येत आहे.सदर निविदा सूचना www.ratnagirinagarparishad.org या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

| अ.क्र | कामाचे नांव | कामाची अंदाजित रक्कम | कामाची बयाणा रक्कम | टेंडर फॉर्म किंमत | काम पूर्ण करणेची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ | १३ वा वित्त आयोगा अंतर्गत आ.क्र.११९ मध्ये बांधणेत येणाऱ्या दफन भूमी मध्ये प्रार्थना हॉल बांधणे/नमाज हॉल बांधणे. | ९३७१५४/- | १००००/- | १०००/- | ४ महिने |
| | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) अंतर्गत खालील कामे | | | | |
| २ | सिव्हील सर्जन बंगला ते सामंत हॉस्पिटल जवळ जावकर कॉर्नर पर्यत हयुम पाईप गटर बांधणे. | ४३८७०५/- | ५०००/- | ५००/- | २ महिने |
| ३ | खेडेकरवाडी वहाळावर (रोडसाईड) आर सी सी स्लॅब कास्टींग करणे. | २११४९८/ | ५०००/- | ५००/- | २ महिने |
| ४ | मांडवी समुद्र येथे विसर्जन मार्ग कॉंक्रीटींग पध्दतीने विकसित करणे | १३७८२४/- | ५०००/- | ५००/- | २ महिने |
| ५ | किल्ला येथे भागोजीशेट कीर शाळा क्र.९ मागील | १८६५११/- | ५०००/- | ५००/- | २ महिने |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | मजगांव मुख्य रस्त्यापासून राजनगरकडे जाणारा रस्ता विकसित करणे व रोड साईड गटर बांधणे. | ७३०१९७ | १००००/- | १०००/- | ४ महिने |
| ७ | बाजारपेठ मच्छीमार्केट जवळील जामा मशिद शेजारील वहाळाची धोकादायक झालेली भिंत तोडून नविन कॉंक्रीटींग करणे. | ७०४६५२/- | १००००/- | १०००/- | ४ महिने |
| ८ | आजगांवकर रेखांकनातील ओपन स्पेस मधील इमारती समोरील रस्ता विकसित करणे. | ४३९५५०/- | ५०००/- | ५००/- | २ महिने |
| ९ | परटवणे नदीचे पाटणकर घराजवळील पाईप कॉजवे जवळ पुराने वाटून गेलेली रिटेनिंग वॉल बांधणे. | १६२२६०/- | ५०००/- | ५००/- | २ महिने |
| १० | तेलीआळी येथील कोतवडेकर घराशेजारील अस्तित्वातील शौचकुपा शेजारी नविन चार सिटस्चे शौचकुप बांधणे. (फेर निविदा) | ३६१६६१/- | ५०००/- | ५००/- | ४ महिने |
| ११ | चैत्रबन वसाहती अंतर्गत गटर बांधकाम करणे. (फेर निविदा) | ५३९०६२ | १००००/- | १०००/- | ४ महिने |

टिप :- १) निविदा दोन लखोटा पध्दतीने सादर करावयाच्या आहेत. लखोटा क्र.१ मध्ये नोंदणीप्रमाणपत्र,आयकर प्रमाणपत्र  इत्यादी आवश्यक कागदपत्रे सादर करणेचे असून लखोटा क्र.२ मध्ये निविदा सादर करावयाची आहेत.

२) वरील कामे दिलेल्या मुदतीतच पूर्ण करावयाची आहेत.

रत्नागिरी नगरपरिषद
दिनांक :-  १९/१०/२०११

मुख्याधिकारी
रत्नागिरी नगरपरिषद